**महाराष्ट्र शासन**
**विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,अमरावती विभाग,अमरावती.**
**टोपेनगर,अमरावती**

दुरध्वनी क्रं.०७२१-२५५३६०४/२५५३६०५ Email Id : - dydamt@gmail.com

जा.क्र. प्राथ/क/----०९----/२०२० दिनांक :- 3 JAN 2020

**पंजिबध्द डाकेने पोच दाखल्यासह**

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
अशोक दर्यानी एज्युकेशन अॅन्ड रिसर्च फाउंडेशन,
शॉप नं.३,फॅनटेसिया मल्टी कॉम्प्लेक्स,वाशी, नवी मुंबई.

**विषय:-** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी देण्याबाबत...

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रमांक:एसएफएस-२०१९/प्र.क्र.१२६३/एसएम-२ दिनांक २० सप्टेंबर, २०१९.

संदर्भिय शासन निर्णयान्वये महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३-चा ०१) तर्गत **अशोक दर्यानी एज्युकेशन अॅन्ड रिसर्च फाउंडेशन,वाशी, नवी मुंबई** व्दारा संचलित **अॅकॅडमिक हाईट्स पब्लिक स्कुल, ट क्र.४५, मुर्तीजापूर, ता.मुर्तीजापूर, जि.अकोला** ही नवीन शाळा (प्राथमिक ते उच्च माध्यमिक,इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी,सर्व खा,इंग्रजी माध्यम,सी.बी.एस.ई.), सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन रण्यासाठी खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून संदर्भीय शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

| | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्न | प्रकार | माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अकोला | **अशोक दर्यानी एज्युकेशन अॅन्ड रिसर्च फाउंडेशन, वाशी, नवी मुंबई** | **अॅकॅडमिक हाईट्स पब्लिक स्कुल, गट क्र.४५, मुर्तीजापूर, ता.मुर्तीजापूर, जि.अकोला** | नवीन शाळा | सी.बी.एस.ई. | इयत्ता १ ली ते १२ वी, सर्व शाखा | इंग्रजी |

**टी व शर्ती:- २.२**

१) संस्थेने प्रस्तावित शाळा मंजुरीपूर्वीच सूरू केली नसल्याची संबधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.अकोला यांनी खात्री करावी. तथापी सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरू केली असल्यास शिक्षणाधिकारी यांनी सदर शाळेकडून रू.१ लक्ष इतका दंड वसूल करून त्याचा अहवाल या कार्यालयास तसेच शासनास सादर करावा.

२) सदर शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यांत येणाऱ्या सर्व नियमांची / तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

३) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम,** २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यांस खालील प्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यांत येत आहे.

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्यांच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

CamScanner

ब) व्यवस्थापनास सन २०२०-२१ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यांत असल्याने शाळा, स्थापन करण्यासाठीशासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्यांच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

क) शासन निर्णय दि.२० जुन २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार **सी.बी.एस.ई.मंडळाचे संलग्नतेकरीता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहिल. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) /जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांच्या कडुन मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नताना ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस, (i) शासनाच्या वेळोवळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, (i महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालनकर **बंधनकारक** राहील.

५) संबधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम २००९, मधील तरतूदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्य** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यांत कोणताही बदल करता येणार ना शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्य शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यांत येईल.

७) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाव्दारेपरवानगीदेण्यांतआलेल्या**नवीन शाळा / दर्जावाढ शाळा**बाबत जिल्हानिहाय U-DI (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरतांना, "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवान प्राप्त शाळा** " म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राह याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल** अधिक म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे संस्थेने सर्व संबंधितांच्या माहितीकरिता "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्र नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्तशाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यीत शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्र करावी.

वरिल प्रमाणे संदर्भिय शासन निर्णयातील सर्व शर्ती व अटींचे पालन करुन त्यानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहिल

**(ए.एस.पैंदोर)**
शिक्षण उपसंचालक
अमरावती विभाग, अमरावती

**प्रतिलिपी सादर:-**

१.मा. आयुक्त, (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीकरिता सादर
२. मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई यांना माहितीकरिता सादर.
३. मा. शिक्षण संचालक, प्राथमिक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीकरिता सादर.
४. मा.शिक्षण संचालक,(माध्यमिक व उच्च माध्यमिक),शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीकरिता सादर.
५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद,अकोला यांना आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

CamScanner